# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक

१.१ प्रस्तावना

१.२ प्रस्तुत संशोधनाची गरज

१.३ संशोधन समस्येचे शब्दांकन

१.४ प्रस्तुत संशोधन विषयातील संज्ञाचे स्पष्टीकरण

१.५ संशोधनाचे महत्व

१.६ संशोधनाची उद्दिष्टे

१.७ संशोधनाची गृहितके

१.८ संशोधनाची मर्यादा

१.९ संशोधनाचे प्रकरणीकरण

१.१० समारोप

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

## १.१ प्रस्तावना

२० व्या शतकात तंत्रविज्ञानाचा झालेला विकास आणि विज्ञानातील प्रगती यामुळे शिक्षणामध्ये अमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. या विज्ञान तंत्रविज्ञानाच्या प्रगतीचा परिणाम म्हणून शिक्षणामध्ये नवे विचार प्रवाह उदयास आलेले आहेत. यासाठी शिक्षण प्रक्रियेत होणाऱ्या गतिमान बदलांना सामोरे जाण्यासाठी आपल्याला नवनवीन तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळवणे आवश्यक आहे.

प्रचलित शिक्षण पध्दती ही विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या ध्येयावर आधारलेली आहे. या ध्येयाच्या पूर्ततेसाठी सध्याच्या शिक्षण प्रक्रियेत अध्यापन पध्दती, शैक्षणिक साधने व वेगवेगळी तंत्रे यांचा परिणामकारक उपयोग कशा प्रकारे होवू शकेल याचा विचार करणे महत्वाचे आहे.

अध्ययन व अध्यापन या दोन्ही क्रिया भिन्न स्वरूपाच्या असल्या तरी त्या क्रियांचा ऐकमेकांशी अतुट संबंध असतो. चांगल्या अध्यापनामुळे अध्ययन प्रक्रिया गतिमान व सुकर होते. अध्ययनाला चालना देणारे अध्यापन तेच खरे अध्यापन होय. चांगल्या अध्यापनात अध्यापक विद्यार्थ्यांना अनेक माध्यमांद्वारा, विविध अध्ययन अनुभुती देण्याचा प्रयत्न करत असतो.

प्राचीनकालीन ग्रीक तत्ववेत्ते सॉक्रेटीस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांनी शिक्षणामध्ये शब्दज्ञानाला अधिक महत्व दिले होते. परंतु कालानुरूप शिक्षणात शब्दज्ञानाची जागा कृतीतून प्रत्यक्ष अनुभव यांनी घेतली. थोडक्यात विद्यार्थ्यांना सजीव अध्ययन अनुभूती देण्यासाठी अनुदेशन साहित्य परिणामकारकरित्या वापरणे गरजेचे आहे. तंत्रविज्ञानातील दूरदर्शन, आकाशवाणी, वर्तमानपत्रे, छायाचित्रे,पारदर्शी प्रक्षेपक, शीर्ष प्रक्षेपक इत्यादी प्रसार

माध्यमांचा जनमानसावर होणारा प्रभावी परिणाम लक्षात घेता. यासारख्या प्रसार माध्यमांचा उपयोग अध्ययन अध्यापनामध्ये केला जावा या उद्देशाने संशोधकाने विचार केला आणि त्या प्रसारमाध्यमातील छायाचित्रणाचा भूगोल विषयाच्या अध्यापनात व संशोधनात होणारा उपयोग याविषयीचे संशोधन करण्याचे ठरविले.

## १.२ प्रस्तुत संशोधनाची गरज

छायाचित्रणाच्या संदर्भात खूप कमी अभ्यास झाला आहे. भूगोल अध्यापनात व संशोधनात छायाचित्रणाच्या उपयोगासंदर्भात संशोधित साहित्याचे अल्प प्रमाण शिक्षणातील या क्षेत्राच्या प्रगतीच्या गरजेवर भर देते. पदव्युत्तर पातळीवर भूगोल अध्यापनात व संशोनात नकाशे, तक्ते, नमुने यांचाच वापर केला जातो. या शैक्षणिक साधनांबरोबरच भूगोलातील प्राकृतिक व सांस्कृतिक घटक, वेगवेगळ्या संकल्पना यांची विद्यार्थ्यांना वास्तव कल्पना येण्यासाठी प्रत्यक्षात त्या घटकांचे छायाचित्र उपयुक्त ठरेल. उदा.- नदी, हिमनदी, वारा या बाह्य शक्ती कारकांनी निर्माण केलेल्या भूमिस्वरूपांची प्रत्यक्ष छायाचित्रे दाखविल्यामुळे विद्यार्थ्यांची आकलन क्षमता अधिकच विकसित होईल व भूगोल अध्यापनाची अपेक्षित उद्दिष्ट्ये साध्य होतील.

म्हणूनच या संशोधनातून ही गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रस्तुत संशोधनातून कोल्हापूर शहरातील झालेल्या छायाचित्रणांचा विकास आणि भूगोल अध्यापनात व संशोधनात छायाचित्रणाचा झालेला उपयोग याचा शोध घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे.

## १.३ संशोधन समस्येचे शब्दांकन

प्रस्तुत संशोधनाची समस्या पुढील प्रमाणे आहे.

"कोल्हापूर शहरातील छायाचित्रणाचा विकास आणि भूगोल विषयामध्ये पदव्युत्तर पातळीवर अध्यापनात व संशोधनात छायाचित्रणाचा उपयोग - एक अभ्यास".

## १.४ प्रस्तुत संशोधन विषयातील संज्ञाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे

संशोधन हे एक शास्त्रीय अभ्यास कार्य आहे. कोणत्याही विषयाचा शास्त्रशुध्द अभ्यास करताना संज्ञा एका विशिष्ठ अर्थानेच वापराव्या लागतात. आणि संशोधन विषय अधिक स्पष्ट व्हावा या हेतूने संशोधन समस्येच्या वरील विधानात वापरलेल्या महत्वाच्या संज्ञाच्या व्याख्या पुढील प्रमाणे आहेत.

### कोल्हापूर शहर -

कोल्हापूर शहर पश्चिम घाटात पंचगंगा नदीच्या काठी वसले असून त्याचे स्थान १६° ४२' उत्तर अक्षवृत्ते व ७४° १४' पूर्व रेखावृत्त आहे. समुद्रसपाटीपासूनची उंची ६५० मीटर आणि एकूण क्षेत्रफळ ६६.८२ चौ. कि.मी. असून २००१ च्या जनगणनेनुसार ०४,८५,१८३ लोकसंख्या आहे.

### छायाचित्रणाचा विकास-

दृश्य प्रकाशाच्या किंवा इतर प्रारणांच्या (तरंगरूपी उर्जेच्या उदा.- क्ष किरणांच्या) मदतीने प्रकाश संवेदनशील रासायनिक द्रव्यांच्या थरावर दृश्य चित्र निर्माण करण्याच्या प्रक्रियेमध्ये अनुक्रमाने होणारा बदल किंवा विस्तार.

### भूगोल विषय-

१) ब्लाश या भूगोल तज्ञांच्या मतानुसार.

"भूगोल म्हणजे मानव पर्यावरण यांच्यामधील परस्पर संबंधाचे शास्त्र होय".

२) हार्टशॉर्न या भूगोल तज्ञांच्या मतानुसार.

"भूपृष्ठाच्या भिन्न गुण - वैशिष्ट्यांचे अचूक, सुसंगत व तर्कशुध्द विवेचन आणि स्पष्टीकरण करणारे शास्त्र म्हणजे भूगोल होय".

### पदव्युत्तर पातळी-

शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए., व बी.एस्सी चा (पदवी) अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर दोन वर्षाचा एम.ए./एम.एस्सी. (पदवी) साठीचा भूगोल विषयाचा अभ्यासक्रम.

छायाचित्र -

छायाचित्रण प्रक्रियेतून मिळालेले उत्पादन. उदा. - छायाचित्र, स्लाईड इत्यादी.

## १.५ संशोधनाचे महत्व

शिक्षण क्षेत्रात कालमानारूप सतत बदल होत असतात. प्रस्थापित शिक्षण प्रणालीमध्ये ज्या बाबी येतात त्यामध्ये अध्ययन, अध्यापन, क्रिडा परीक्षा, संशोधन-अभ्यासक्रम, अभ्यासपूरक कार्यक्रम यांचा प्रामुख्याने समावेश होतो. या सर्व बाबी जेवढ्या आदर्शवत असतील तेवढ्या प्रमाणात शिक्षण प्रक्रिया यशस्वी होते.

शिक्षण प्रक्रियेत अध्यापन परिणामकारक होण्यासाठी अनेक शिक्षण तज्ञांनी अतोनात प्रयत्न केले. हर्बाटने पाठांच्या पाच पायऱ्या निर्माण करून अध्यापनाच्या नियोजनाचा पाया घातला. त्यानंतर आज जगात तंत्रविज्ञानाची इतकी प्रगती झालेली आहे की, त्या तंत्रविज्ञानाचा शिक्षणामध्ये अध्यापनासाठी वापर करण्याचा मोह शिक्षण तज्ञांना न झाल्यास नवल होय.

भूगोल विषयाचा अभ्यास करत असताना शैक्षणिक तंत्रविज्ञान हे महत्वाचे ठरते. या विषयाच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत नकाशा, चित्रे, तक्ते, पृथ्वीगोल यांना महत्व आहे. त्याचबरोबर भूगोलात छायाचित्रांचीही आवश्यकता आहे. कारण वेगवेगळे अध्ययन अनुभव व संकल्पना स्पष्ट करत असताना ती फक्त शब्दांच्या माध्यमातून न सांगता प्रत्यक्ष वास्तव छायाचित्र त्या ठिकाणी दाखविले किंवा विद्यार्थ्यांना पहायला दिले तर संकल्पना त्याला स्पष्टपणे समजेल.

छायाचित्रण हा प्रकार दृक-श्राव्य साधनातील दृक साधन प्रकारातील अप्रक्षेपित साधनातील स्थिरचित्रे या प्रकारात येतो. दैनंदिन अध्यापनामध्ये काही घटक असे असतात की, त्या आकृत्या किंवा चित्रांच्या सहाय्याने यथार्थपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचू शकत नाहीत. अशा वेळी त्यांच्यापुढे वास्तवता निर्माण करण्यासाठी छायाचित्रे वापरणे अधिक उपयुक्त ठरते.

उदा.- चंद्रवीराने यानातून घेतलेले पृथ्वीचे छायाचित्र, काही शास्त्रज्ञ किंवा विद्वानांची छायाचित्रे, उपग्रहाच्या सहाय्याने घेतलेली पृथ्वीच्या विविध प्रदेशांची छायाचित्रे.

विद्यार्थ्यांचे अवधान केंद्रीत करण्यासाठी व आकर्षित करून घेण्यासाठी छायाचित्रांचा अध्यापनात उपयोग होतो.

वरील परिच्छेदावरून भूगोल विषय अध्यापनामध्ये तंत्र विज्ञानाची गरज दिसून येते. छायाचित्रण हा देखील तंत्रविज्ञानाचाच एक भाग आहे. आज शिक्षण क्षेत्रात भूगोल विषयाच्या संदर्भात छायाचित्रणाचा वापर केला जात आहे. तरीसुध्दा वापरातील भविष्यामुळे व नियोजनामुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया परिणामकारक होईल हे महत्व लक्षात घेवून याच क्षेत्रामध्ये संशोधन करण्याचे ठरविले.

**प्रस्तुत संशोधनाचा उपयोग -**

१) छायाचित्रणाचा ऐतिहासिक आढावा जाणून घेणेसाठी.

२) कोल्हापूर शहरातील छायाचित्रण प्रक्रियेच्या भौतिक सुविधा, साधने, तंत्र व फोटो विकसित करण्याची पध्दती यामध्ये झालेल्या विकासाची माहिती जाणून घेणेसाठी.

३) पदव्युत्तर पातळीवर भूगोल अध्यापनात व एम.फिल., पीएच.डी. संशोधनात छायाचित्रणांच्या उपयोगाचा कल जाणून घेणेसाठी.

४) भूगोलाच्या विविध शाखांमध्ये छायाचित्रणाच्या उपयोगाचा कल जाणून घेणेसाठी.

५) पदव्युत्तर पातळीवर भूगोल अध्यापनात व संशोधनात छायाचित्रांचा परिणामकारक उपयोग करण्यासाठी विविध मार्ग जाणून घेणे इत्यादी साठी करता येईल.

## १.६ संशोधनाची उद्दिष्टये

प्रस्तुत संशोधनाला निश्चीत दिशा प्राप्त होण्यासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत ती पुढील प्रमाणे.

(१) कोल्हापूर शहरातील छायाचित्रण प्रक्रियेच्या विकासामध्ये भौतीक सुविधा, साधने, तंत्रे आणि छायाचित्र विकसित करण्याची पध्दती यात असलेल्या आधुनिकतेचा शोध घेणे.

(२) भूगोल विषयात पदव्युत्तर पातळीवर अध्यापनात होणाऱ्या छायाचित्रणाच्या उपयोगाचा शोध घेणे.

(३) छायाचित्रणाच्या उपयोग केलेल्या संशोधन कार्याचे भूगोल विषयाच्या विविध शाखांमध्ये वर्गीकरण करणे.

(४) भूगोल विषयात एम.फिल., पीएच.डी. पदवीसाठी झालेल्या संशोधन कार्यात छायाचित्रणाच्या उपयोगाचा शोध घेणे.

(५) भूगोल विषयाच्या पदव्युत्तर पातळीवर अध्यापनात व एम.फिल., पीएच.डी. पदवीसाठी झालेल्या संशोधन कार्यात छायाचित्रणांचा परिणामकारक उपयोग करण्यासाठी उपाय सुचविणे.

## १.७ संशोधनाची गृहितके

प्रस्तुत संशोधनाची गृहितके पुढील प्रमाणे मांडलेली आहेत.

(१) कोल्हापूर शहरातील छायाचित्रण प्रक्रियेच्या विकासामध्ये आधुनिकता आलेली आहे.

(२) भूगोल या विषयात सर्वच पातळीवर (प्राथमिक ते पदव्युत्तर) अध्यापनात छायाचित्रणाचा उपयोग केला जातो.

(३) एम.फिल, पीएच.डी. पदवीसाठी झालेल्या संशोधन शोधप्रबंधात छायाचित्रणाचा उपयोग केला जातो.

## १.८ संशोधनाच्या मर्यादा

प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा पुढील प्रमाणे आहेत.

(१) सदरचे संशोधन छायाचित्रणाच्या प्रक्रियेत आलेली आधुनिकता समजून घेणेकरिता फक्त कोल्हापूर शहरापुरते मर्यादित राहील.

(२) प्रस्तुत संशोधन शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील कोल्हापूर सातारा व सोलापूर येथील भूगोल पदव्युत्तर विभागांपुरतेच मर्यादीत राहील.

(३) शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विषयाच्या पदव्युत्तर पातळीवर अध्यापन करणाऱ्या अध्यापकांपुरतेच मर्यादीत राहील

(४) शिवाजी विद्यापीठाने भूगोल विषयाच्या एम.फिल., पीएच.डी. पदवी सन २००१ पर्यंत प्रदान केलेल्या शोध प्रबंधापुरतेच मर्यादीत राहील.

## १.९ संशोधनाचे प्रकरणीकरण

प्रकरण पहिले - प्रास्ताविक

या प्रकरणात संशोधन समस्येचे शीर्षक, संज्ञाचे स्पष्टीकरण, संशोधनाचे महत्व, उद्दिष्ट्ये, गृहितके, मर्यादा स्पष्ट केलेल्या आहेत.

प्रकरण दुसरे - छायाचित्रणाची ऐतिहासीक पार्श्वभूमी (इतिहास, प्रगती व आढावा)

या प्रकरणात छायाचित्रणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि छायाचित्रणाशी संबंधीत साहित्याचा अभ्यास इत्यादी घटकांची माहिती दिली आहे.

प्रकरण तिसरे - संशोधनाची कार्यपध्दती

या प्रकरणात संशोधनासाठी वापरलेली पध्दत, नमुना निवड, सामग्री गोळा करण्यासाठी वापरलेली साधने, सामग्री जमा करण्याची कृती, संशोधन साधनांचे विश्लेषण, विश्लेषण पध्दती इ. घटकांची माहिती दिली आहे.

प्रकरण चौथे - संशोधन सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

या प्रकरणात जमा केलेल्या सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन कसे केले आहे या संबंधीचा उहापोह केलेला आहे.

प्रकरण पाचवे - सारांश निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनाचा सारांश निष्कर्ष व शिफारशी तसेच पुढील अभ्यासासाठी सुचविलेल्या विषयांचा समावेश केलेला आहे.

## १.१० समारोप

सदर प्रकरणात प्रस्तुत संशोधनाची पार्श्वभूमी विशद करण्यासाठी यथायोग्य आराखडा दिलेला आहे. त्यामध्ये संशोधन समस्येचे विधान, संशोधन विधानात वापरलेल्या महत्वाच्या संज्ञाच्या व्याख्या, संशोधन समस्येचे महत्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके संशोधनाच्या मर्यादा आणि संशोधनाचे प्रकरणीकरण या बाबींची चर्चा केलेली आहे.

दुसऱ्या प्रकरणात प्रस्तुत संशोधनासाठी संबंधित साहित्याचा अभ्यास आणि छायाचित्रणाची ऐतिहासीक पार्श्वभूमी विषयी आढावा घेतला आहे.